संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण हे पद तात्पुरत्या कालावधीसाठी पदावनत करण्याबाबत.....

महाराष्ट्र शासन
ग्राम विकास विभाग
शासन निर्णय क्रमांकः प्रआयो-२०१७/प्र.क्र.२६७/योजना-१०
बांधकाम भवन, २५ मर्झबान रोड,
फोर्ट, मुंबई- ४०० ००१.
तारीख: ३० ऑक्टोबर, २०१७

वाचा:-

1) शासन निर्णय क्रमांकः इंआयो-२०१५/प्र.क्र.२४०/योजना-१०, दि.१६ जुलै, २०१५.
2) शासन निर्णय क्रमांकः इंआयो-२०१५/प्र.क्र.४१३/योजना-१०, दि.१० फेब्रुवारी, २०१६.
3) शासन निर्णय क्रमांक:प्रआयो-२०१७/प्र.क्र.२६७/योजना-१०, दि.१३ ऑक्टोबर,२०१७.

प्रस्तावना:-

केंद्र पुरस्कृत इंदिरा आवास योजनेची अंमलबजावणी केंद्र शासनाच्या मार्गदर्शक तत्वानुसार प्रभावीपणे करण्यासाठी राज्य शासनाने संदर्भाधीन क्रमांक १ येथील शासन निर्णयान्वये “राज्य व्यवस्थापन कक्ष-इंदिरा आवास योजना” ही राज्यस्तरीय संस्था गठीत करण्याचा निर्णय घेण्यात आला. तसेच इंदिरा आवास योजनेबरोबरच अन्य राज्य पुरस्कृत ग्रामीण घरकुल योजनांची एकछत्री अंमलबजावणी करण्यासाठी राज्य व्यवस्थापन कक्ष-इंदिरा आवास योजना या कक्षाची व्याप्ती “राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण” कक्ष संदर्भाधीन क्रमांक २ येथील शासन निर्णयान्वये गठीत करण्यात आला आहे.

राज्य व्यवस्थापन कक्ष-इंदिरा आवास योजना करिता सुरूवातीस राज्य शासनाने ग्राम विकास विभागाच्या आस्थापनेवरील एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम अंतर्गत कालबाहय झालेली पदे वित्त विभाग शासन निर्णय दि.२ जून, २०१५ मधील प्रशासकीय विभागांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये वरील संदर्भ क्रमांक १ अन्वये रूपांतरीत करण्यात आली आहेत. यामध्ये ग्राम विकास विभागाच्या आस्थापनेवरील अतिरिक्त संचालक हे पद संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-इंदिरा आवास योजना या पदामध्ये रूपांतरीत करण्यात आले.

ग्रामीण गृहनिर्माण योजना ही केंद्र व राज्य शासनाची महत्वाकांक्षी योजना असल्यामुळे प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) ची धोरणे निश्चित करण्यासाठी केंद्र शासनाशी संपर्क करणे, अन्य विभागाच्या

योजनांकरिता संबंधित विभागांशी संपर्क करणे, योजनेच्या निधीचे व्यवस्थापन व संनियंत्रण करणे, क्षेत्रीय स्तरावरील कार्यालयांच्या अडीअडचणींचे निराकरण करणे, अपूर्ण घरकुले पूर्ण करणे, यासाठी केंद्र,राज्य व क्षेत्रीय स्तरावर आवश्यक तो पत्रव्यवहार करणे इत्यादी स्वरूपाची कामे कक्षामार्फत करणे अपेक्षित आहे. त्यामुळे संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण या पदावर केंद्र / राज्य शासनाकडील अधिकारी असणे आवश्यक आहे. ही बाब विचारात घेऊन संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण ह्या पदाच्या सेवाप्रवेश नियमात वरील संदर्भ क्र.३ अन्वये सुधारणा करण्यात आली आहे. संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण हे पद प्रशासकीय कारणास्तव काही कालावधीकरिता पदावनत (Downgrade) करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माणच्या आस्थापनेवरील संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण हे रू.१५६००-३९१०० ग्रेड पे रू.७६००/- या वेतनश्रेणीतील पद काही कालावधीकरिता रू.१५६००-३९१०० ग्रेड पे रू.६६००/- या वेतनश्रेणीत पदावनत (Downgrade) करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७१०३०१६४५०११६२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Anil Madhao Kale

Digitally signed by Anil Madhao Kale
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Rural Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=e29bfbc8f31dc2b43b5ba876864f627ec1dc888a2c6faead66c26cb1a5c2f137, cn=Anil Madhao Kale
Date: 2017.10.30 16:56:23 +05'30'

अनिल मा. काळे
उप सचिव, ग्राम विकास विभाग

प्रत,

१) मा.राज्यपाल यांचे सचिव
२) मा.मुख्यमंत्री यांचे सचिव

३) मा.मंत्री (ग्राम विकास) यांचे स्वीय सहायक
४) मा.राज्यमंत्री (ग्राम विकास) यांचे स्वीय सहायक
५) मा.मुख्य सचिव यांचे सह सचिव
६) अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव /सचिव, नियोजन/वित्त/सामाजिक न्याय/ आदिवासी विकास/ गृहनिर्माण विभाग
७) महालेखापाल, (लेखा परिक्षा) व (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१, मुंबई (पाच प्रतींसह)
८) महालेखापाल, (लेखा परिक्षा) व (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-२, नागपूर (पाच प्रतींसह)
९) सर्व विभागीय आयुक्त
१०) आयुक्त, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना, नागपूर
११) सर्व जिल्हाधिकारी
१२) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद तथा अध्यक्ष, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा
१३) सर्व उप आयुक्त (विकास), विभागीय आयुक्त कार्यालय
१४) संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-इंदिरा आवास योजना, सिडको भवन (दक्षिण कक्ष), सी.बी.डी.बेलापूर, नवी मुंबई.
१५) सर्व प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा
१६) जिल्हा कोषागार अधिकारी, ठाणे
१७) उप कोषागार अधिकारी, बेलापूर, नवी मुंबई.
१८) वित्त विभाग (व्यय-१५) व (अर्थ-१७) मंत्रालय मुंबई-३२.
१९) नियोजन विभाग (१४८१/१४४४), मंत्रालय, मुंबई-३२
२०) अप्पर संचालक, प्रकल्प आखणी व एकात्मीक ग्रामीण विकास कार्यक्रम कक्ष,
२१) कार्यासन अधिकारी, वित्त-७, वित्त-१, योजना-१, योजना-२, योजना-५ व योजना-७, आस्था-३,ग्राम विकास व जलसंधारण विभाग.
२२) निवड नस्ती.